IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# पर्यावरणाचा माणदेशी लोकसंस्कृतीवरील परिणाम : एक अभ्यास

**कु. यादव नयना नारायण [1], प्रा. डॉ. सुवर्णा सुखदेव गुंड [2]**
संशोधक विद्यार्थीनी[1],संशोधन मार्गदर्शक[2],
मु. पो. खंडाळी, ता. माळशिरस[1] ,मराठी विभाग प्रमुख[2],
माऊली महाविद्यालय, वडाळा[2]
ता. उ. सोलापूर, जि. सोलापूर[2]
pataleavinash5@gmail.com[1]

**सारांश (Abstract):** *पर्यविरण आणि मानव यांचे नाते अत्यंत घनिष्ठ आणि परस्परावलंबी आहे. संपूर्ण मानवाचे जीवन पर्यावरणाशी निगडीत आहे. पर्यावरण ही संज्ञा मुलत म्हणजे सभोवतालची परिस्थिती या अर्थाने प्रचलित आहे. कोणत्याही भूप्रदेशाचा विकास हा तेथील नैसर्गिक साधन संपत्तीवर अवलंबून असतो. त्या प्रदेशाची भौगोलिक रचना, हवामान, पर्यजन्यमान , जमिनीचा प्रकार आणि नैसर्गिक साधनसंपत्ती यांचा त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनशैलीवर, आर्थिक व्यवस्थेवर, सामाजिक रचनेवर आणि संस्कृतीवर मोठा प्रभाव पडतो. पर्यावरण हा लोकसंस्कृतीचा पाया आहे. तेथील पर्यावरणच तेथील लोकांचे अन्न व पेहराव, घरबांधणी आणि राहणीमान, लोकजीवन, सण-उत्सव, लोकसाहित्य, साहित्य, भाषा इ. गोष्टी ठरत असतात. माणदेशासारख्या विशिष्ट भौगोलिक परिस्थिती प्राप्त प्रदेशाचा तेथील लोकसंस्कृतीवर काय प्रभाव पडतो आणि तो कशा स्वरूपात पडला आहे याचा वेध या शोधनिबंधाद्वारे घेण्यात येणार आहे.*

**मुख्य शब्द:** पर्यावरणाचा माणदेशी लोकसंस्कृतीवरील परिणाम : एक अभ्यास

## I. प्रस्तावना :

महाराष्ट्राचे कोकण, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, दक्षिण महाराष्ट्र असे काही ठळक उपविभाग सहजपणे लक्षात येतात. या प्रत्येक भागाचा निसर्ग, मानवी जीवन हे पूर्णत: वेगळे आहे. प्रत्येक प्रदेशाची भौगोलिक रचना, तिथला इतिहास, समाज, आर्थिक व राजकीय परिस्थिती मध्ये भिन्नत्व आढळते. विशिष्ट भूप्रदेशाची लोकसंस्कृती तेथील पर्यावरणाचे सिध्द होत असते. असाच एक वैशिष्टपूर्ण उपेक्षित असलेला प्रदेश म्हणजे माणदेश होय. संत नामदेवांनी आपल्या अभंगात 'धन्य धन्य गा माणदेशु। जेथे विठ्ठल केला रहिवासु'॥ असे म्हटले आहे. त्याचप्रमाणे पंढरपुरातील 84 च्या शिलालेखात माणदेशातील लोकांनी विठ्ठल मंदिराला देणगी दिल्याचा उल्लेख आहे. माणदेशाच्या भौगोलिक पर्यावरणाचा तेथील लोकजीवन, लोकसंस्कृती वरील प्रभाव अभ्यासण्यासाठी प्रथम माणदेशाची भौगोलिकता कशी आहे हे पाहणे उचित ठरेल.

- **माणदेशी भौगोलिक पर्यावरण** : -

माणदेश हा सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्याच्या सीमारेषेवर असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूसांस्कृतिक प्रदेश आहे. माणदेश म्हणजे भीमा नदीला उजवीकडून मिळणाऱ्या माण नदीच्या खोऱ्यातील प्रदेश असे मत माणदेशाचे संशोधक डॉ. कृष्णा इंगोले यांनी मांडले आहे. त्यांच्या मते राष्ट्रकूट घराण्यातील मानांक राजाच्या नावावरून या भूप्रदेशाला 'माणदेश' हे नाव पडले असावे. निसर्गाची सर्व दृष्टीने अवकृपा असलेला माळरानाचा प्रदेश म्हणूनही माणदेश ओळखला जातो.
माणदेश हा पश्चिम-दक्षिण महाराष्ट्रात येतो. माणदेशाचा रेखावृत्तीय विस्तार 84 अंश, 22 मी, 30 सें.मी. ते 75 अंश, 30 मी. पूर्व रेखांश येतो. तर अक्षांश 17 अंश उत्तर अक्षांश ते 17 अंश 41 मी. 41 सें. उत्तर अक्षांश असा आहे. सातारा-सांगली-सोलापूर या तीन जिल्ह्याच्या सीमारेषेवर स्थान आहे. यामध्ये माण, आटपाडी हे संपूर्ण तालुके, खटाव तालुक्यातील एक गाव, सांगोला तालुक्यातील 81 गावे, कवठेमहांकाळ मधील 13 गावे, जत मधील 12 गावे, मंगळवेढ्यातील 20 गावे, पंढरपूर मधील 12 गावे माणदेशात येतात.


DOI: 10.48175/IJARSCT-37540

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

माणदेशाचा पूर्व-पश्चिम विस्तार 116.8 कि.मी. तर दक्षिण-उत्तर विस्तार 91.2 कि.मी. इतका आहे. माणदेशाचे एकूण क्षेत्रफळ 48700 चौ.कि.मी. आहे. प्रदेशातील मुख्य नदी माण असून वाघजाई, बेलवण, कोरडा, अप्रुफा या लहान उपनद्या माणगंगा नदीस मिळतात आणि शेवटी माणगंगा 163 कि.मी. प्रवास करून सरकोली येथे भीमा नदीस मिळते. माणदेशाचे हवामान समशीतोष्ण असले तरी उष्ण व निमशुष्क आहे. तर पर्जन्यमान सरासरी 540 मि.मी. इतके आहे. लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेतीपूरक पशुपालन ही केले जाते. देखणी खिलारी जनावरे, शेळ्या-मेंढ्या, कायम दुष्काळी प्रदेश, संयमी, सोशिक जनता, बोर-डाळिंब फळबाग आणि वैशिष्ट्यपूर्ण माणदेशी बोली ही माणदेशाची प्रमुख वैशिष्ट्ये ठरतात.

माणदेशाचा भौगोलिक परिस्थिती अभ्यासल्यानंतर या परिस्थितीच्या तेथील लोसंस्कृतीवर होणारा परिणाम पुढील मुद्द्याच्या आधारे अभ्यासणार आहोत. कोणत्याही प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीचा परिणाम तेथील जनजीवनावर होत असतो. त्यातून एक संस्कृती आकाराला येत असते. संस्कृती तेथील लोकांची जीवनपध्दती, लोकांचा पेहराव, शेती, पीके, सण-उत्सव, देव-देवता, साहित्य, भाषा, कला, कायदे, नीती, परस्परांशी व्यवहार इ. अनेक गोष्टीतून प्रतिबिंबित होते.

➢ **माणदेशातील घरे, आहार व पोशाख : -**

माणदेशाच्या घरांमध्ये विविधता आढळते. कारण इथे राजे राजवाड्यापासून श्रीमंत, गरीब, अतिगरीब लोक राहतात. काही ठिकाणी राजवाडे आजही पहायला मिळतात. माणदेश हा दुष्काळी भाग असल्याने व हवामान निमशुष्क असून उष्ण व कोरडे असल्याने माळवादी, तनसाची, पाल्याची घरे इथे आढळतात. माळवादी घरे उन्हाळ्यात थंड व थंडीत उबदार राहतात. दिवळी, जोते, किलेचाणे आडे यांच्यापासून तयार झालेली घरे माणदेशात पाहयला मिळतात. परंतू आता कालानुरूप परिस्थितीमुळे घरांच्या रचनेत बदल होताना दिसत आहे. टोलेजंग बंगले आता ग्रामीण भागात ही दिसतात.

आहार-पोशाख चा विचार केला तर त्यावर तेथील भौगोलिकतेचा प्रभाव पाहयला मिळतो. पर्जन्याचा अभाव, दुष्काळामुळे शेती व्यवसायाचा विकास झालेला नाही. त्यामुळे त्यांच्या खाण्यात ज्वारी, बाजारीचा भाकरी, डाळीची भाजी आढळते. शिमगा सणानंतर धुलवड साजरी करताना जेवणात मांसाहाराचा मोठ्या प्रमाणात सामवेश होतो. पोशाखात पूर्वी माणदेशी माणूस बाराबंदी किंवा सदरा, परका, धोतर वापरत होता. आतात्यात बदल होऊन विजार, टोपी, पँन्ट, शर्ट वापरू लागला. स्त्रिया लुगडी-चोळी, छापील पातळ, ब्लाऊज वापरतात. आता पंजाबी ड्रेस, जीन्स ही स्त्रीया वापरताना दिसतात.

➢ **माणदेशी वनस्पती जीवन : -**

माणदेशी वनस्पती जीवन फारसे समृध्द असे नाही. कारण अपुरा अनिश्चित पावसामुळे, उथळ-बेरड जमिनीमुळे झडुपवर्गीय वनस्पती येथे आढळतात.

उदा. निरगुडी, तरवड, खैर, हिवर, नेपतडी, शेर, वेडी बाभुळ, मोगली एरंड, कन्हेर, आघाडा, कातमोडा ह्या वनस्पती माणदेशात आढळतात. पूर्वी हा दंडकारण्याचा भाग होता, जंगले ही अस्तित्वात होती. आता माणदेशात आंबा, चिंच, बोर यांच्या बागा निर्माण झाल्या आहेत.

➢ **शेळ्या: मेंढ्या पालन : -**

माणदेशात खिलारी जनावरासोबत शेळ्या-मेंढ्या पाळल्या जातात. या प्रदेशात शेळ्या-मेंढ्यांचे पालन करणारा धनगर समाज मोठ्या प्रमाणात आढळतो. माणदेशात खुरट्या वनस्पती अधिक आहेत. मुरमुळी, बोरी, बाभळी, केकत, नेपतडी देवबाभळ अशी झाडे-झुडपे पाऊस पडल्यानंतर उगवणाऱ्या छोट्या छोट्या वनस्पती हे या शेळ्या-मेंढ्यांचे अन्न असते. पिक काढल्यानंतर मोकळ्या जमिनीतील धसकटे, गवत पालापाचोळा खाऊन ही जनावरे जगू शकतात. माणदेशात या प्राण्यांसाठी चांगले हवामान असल्यामुळे जनावरांची चांगली वाढ होते. माणदेशातील या जनावरांना मांसासाठी मागणी आहे.

➢ **माणदेशीतील पिके व पध्दत : -**

माणदेशातील शेती हा प्रमुख व्यवसास असला तरी अपुरे पर्जन्यमान दुष्काळामुळे फारसा विकसीत झालेला दिसत नाही. माणदेशात साधारण माळरानाची तांबडतोंडी, करल चोपन, तांबडी व काळी कसदार जमीनही आढळते. त्यामुळे तेथील शेतकरी

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

हवामानाशी जुळवून घेणारी पिके घेतात. ज्वारी, बाजरी, तुर, हरभरा, मूग यासारखी कोरडवाहू पिके येथे मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. ही पिके कमी पाण्यावरही येतात. खरीप, रब्बी आणि उन्हाळी पध्दतीची पीक पध्दती इथे आढळते. खरीप हंगामात बाजरी, हुलगे, मटकी, भुईमूग, मूग, भाजीपाला इ. पारंपारिक पिके घेतली जातात. रब्बी हंगामात ज्वारी, गहू, करडई, मका, भाजीपाला, ऊस ही पिके घेतात. उन्हाळी हंगामात पूर्वी कापूस, संकरित ज्वारी ही पिके होती. आता बोर-डाळिंबाच्या बागा मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. माणदेशात कोरडे-निमशुष्क वातावरण या बागांसाठी उपयुक्त ठरत आहे.

- **सण-उत्सव व देवदेवता** : -

माणदेशात सण-उत्सव ऋतुचक्राप्रमाणे साजरे केले जातात. दसरा, दिवाळी, होळी, गुढीपाडवा, नागपंचमी, बकरी ईद, रमजान इ. सण हिंदु-मुस्लिम धर्माचे लोक आनंदाने साजरा करताना दिसतात. माणदेश हा पशुपालकांचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. उजाडमाळरानाने इथले पशुधन जोपासले आहे. माणदेशात बैल-पोळा हा सण माणदेशात तीन वेळा साजरा करतात. कारोनी बेंदूर, आषाढी बेंदूर, श्रावणी पोळा साजरा केला जातो. दिवाळी व वसुबारस गायी-गुरांना ओवाळून गाणी म्हणून साजरी करतात. धनगर समाज जास्त असल्याने देवळाभोवती मेंढरे पळवण्याचा विधी, म्हैशींच्या शर्यती, रेड्यांच्या टकरी इ. कार्यक्रम केले जातात.
माणदेशात लोकदैवते पशुपालकांची आढळतात. उदा. लखमेश्वर, बिरोबा, शिखर-शिंगणापूर महादेव, म्हसवड, खरसुंडीचा सिध्दनाथ, मंदिरे पाहावयास मिळतात. साधुसंताविषयी आख्यायिका पाहायला मिळतात. माणदेशी माणूस मागासलेला व नैसर्गिक परिस्थितीमुळे देवभोळा असून परमेश्वरावर हवाला ठेवणारा आहे. प्रत्येक गावात मारूती, गणपती, महादेव, मरीआई, म्हाकुबाई, म्हसोबा, सिदोबा, खंडोबासारखी ग्रामदैवते आढळतात.

- **संयमी व सोशिक लोक** : -

माणदेशी माणसं परिस्थितीशी संघर्ष करीत चिवटपणे जगणारी आहेत. प्रतिकूल परिस्थिती आणि राजकीय पाठबळाचा अभाव असतानाही ही माणसे तीव्र जीवन इच्छेने संयमाने जगत आहेत. कृष्णा इंगोले यांच्यामते आजपर्यंत माणदेशात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे एकही उदाहरण नाही. आहे त्या परिस्थितीला तोंड देत कराटकसरीने राहणे, जगणे हे इथल्या माणसांची वैशिष्ट्ये अशा प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष करत इथली काही माणसे कर्तुत्वान झाली आहेत. उदा. भाई गणपतराव देशमुख, श्रीमंत बाबासाहेब देशमुख, बापूसाहेब झपके, भगवानराव प्रतिनिधी इ.

- **स्थलांतर** : -

माणदेशावर निसर्गाची अवकृपा असल्याने तेथील जनावरांना, लोकांना पोटासाठी स्थलांतर करावे लागते. पाऊसकाळ कमी झाला तर धनगरी समाज आपल्या मेंढ्यांना घेऊन देशावर जातात. ऊसतोडी कामगारही हाताला काम मिळण्यासाठी स्थलांतर करतात. गवई व्यवसायात गुंतलेले अनेक लोक परराज्यात जाऊन व्यवसाय करतात व पोटाचा प्रश्न सोडवताना दिसतात.

- **माणदेशी बोली** : -

भौगोलिक परिस्थिती व पर्यावरण; आणि भाषेची विविधता यांचा संबंध असतो. माणदेशी बोली स्वत:चे वेगळेपण जपणारी एक बोली आहे. कोणत्याही प्रदेशाची बोलीभाषा त्याविशिष्ट प्रदेशातील प्रादेशिक संस्कार व अनुभूती यांच्याशी निगडीत असते. माणदेश कर्नाटक, सीमा असल्याने कानडी भाषेचा प्रभाव तिच्यावर दिसतो. पश्चिमेकडील सातारी बोलीचा कडकपणा व रूक्षतेचा परिणाम तिच्यावर जाणवतो. उत्तरेकडे सोलापुरी भाषेचाही जाणवतो. माणदेशात वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे तेथील धनगर, व्यापारी, शेतकरी यांना समृध्द भागात स्थलांतर करावे लागते. तेथे दुसऱ्या भाषेच्या संपर्कात आल्याने उच्चार बदलताना दिसून येतात. माणदेशी हवामान निमशुष्क व कोरडे आहे. ऑस्टॉफ या भाषा शास्त्रज्ञाने हवामानाचा परिणाम तेथील उच्चारावर होतो असे म्हटले आहे. त्यामुळे शब्दांत महाप्राण मिसळताना दिसतात. उदा. हाकडं (इकडे), माणदेशात धूळ पेरणीवर हुलगे, मूग, मटकी इ. पिके घेतात यावरून इथे एक वाक्यप्रचार रुढ झाला. उदा. 'हुलग्याच्या वाफेचा' किंवा माळरानावर मटकी, बाजरी सारखी पिके येतात म्हणून एक म्हण रूढ झाली उदा. माणदेश दांडगा आणि भाकरीवर सांडगा. भौगोलिक वैशिष्ट्यामुळे इथे मटकी पिकते. मोड

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

आणून खाणाऱ्या, पैलवानकी करणाऱ्याला 'मटकी पैलवान' संबोधले जाते काही गावाच्या भौगोलिक वैशिष्ट्यामुळे काही लोकोक्ती प्रसिध्द आहेत. उदा. 'पंढरपूर पाण्याचं, मंगुडं दाण्याचं, सांगुलं सोन्याचं.

- **लोकसाहित्य** : -

माणदेशाच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचा प्रभाव लोकगीते यावर पडलेला जाणवतो. माणदेशात पर्जन्यमान फारच कमी असल्याने तेथील गीतांमधून, ओव्यांमधून आलेले शब्द तहानलेले जाणवतात.

उदा. पडपड रे पावसा, गाईगुराच्या सतवाला। माणदेशी लोकगीते काळानुसार बदललेली दिसतात. पाण्याचा प्रश्न ज्वलंत असल्याने बुध्दीहाळला तलाव झाल्यामुळे त्या परिसरातील गावाची अवस्था पुढील ओळीतून प्रकटते.

**'बुध्देहाळला झालयं तळं, गौडवाडीचं गेल्यात मळं।**
**सोमेवाडी उठून पळं। बुध्देहाळ गावावरून गेलायं नळं॥**

- **माणदेशी साहित्य** : -

प्रादेशिक पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या साहित्यात विशिष्ट भौगोलिक प्रदेश त्या कलाकृतीचा अविभाज्य घटक असतो. त्याप्रमाणे माणदेशी साहित्यालाही तेथील भूप्रदेशाने जीवनरस

पुरवला आहे. लेखक ही त्या प्रादेशिक वातावरणात घडलेला असतो. त्यामुळे प्रदेशाचे संस्कार त्यांच्या साहित्यात उमटलेले दिसतात. ग. दि. माडगूळकर, व्यंकटेश माडगूळकर, शंकरराव खरात, म. गो. पाठक, द. ता. भोसले, कृष्णा इंगोले सारख्या लेखकांनी माणदेशी साहित्य समृध्द केले आहे. माणदेशाची भौगोलिक वैशिष्ट्य या साहित्यिकांच्या साहित्यातून पाहयला मिळतात. ग. दि. माडगूळकरांनी 'उभे धागे, आडवे धागे' या कादंबरीतून संपूर्ण माणदेशच साकारलेला आहे. या कादंबरीतील जगू पावसाविषयी म्हणतो, 'आमच्या मुलाखत पावसाची रडच, मृग नक्षत्राचे चार थेंब पडले, दगड भिजव्या पाऊस' असे माणदेशी पावसाचे वर्णन येते. कृष्णा इंगोले यांच्या 'माणदेश स्वरूप आणि समस्या' सारख्या संशोधनपर ग्रंथातून सर्वांगीण माणदेश साकारला आहे. त्यांच्या कथांमधून लोक साहित्य, ललितगद्य, वैचारिक साहित्यातून माणदेशाचे वर्णन येते.

## II. समारोप : -

कोणताही भूप्रदेश, तेथील लोकजीवन तेथील भौगोलिक पार्श्वभूमीमुळे संस्कारित होते. विविध संस्कृती आणि परंपरा अनेकदा विशिष्ट भौगोलिक स्थानाशी जोडल्या जातात. माणदेशी लोसंस्कृती विलक्षण एकजिनसी आढळते. तेथील लोकांचे राहणीमान, जीवन-धारणा, श्रध्दा-निष्ठा, धार्मिक जीवन, सण-समारंभ, चालीरिती, धर्म सहिष्णुता, माळवादी घरे, वेशभूषा, आहार, परिस्थिती शरण देवभोळेपणा, बोली भाषा यावर तेथील भौगोलिक परिस्थितीचा परिणाम झालेला पाहयला मिळतो.

## III. निष्कर्ष : -

1) एखाद्या भूप्रदेशाचा प्रभाव तेथील संस्कृती व भाषेवर जणवतो.
2) माणदेशाच्या प्राकृतिक रचनेच्या परिणामातून त्या प्रदेशाची विशिष्ट अशी भूसंस्कृती आकाराला आलेली दिसते.
3) माणदेशातील एकूणच लोकजीवनावर तेथील पर्यावरणातील घटकांचा परिणाम झालेला पाहयला मिळतो.
4) माणदेशातील दुष्काळ, पर्जन्याचा अभाव, पाण्याचे दुर्भिक्ष्य, प्राकृतिक रचनेचा परिणाम माणदेशी जीवनावर झालेला दिसतो.
5) माणदेशातील प्रतिकूल परिस्थितीमुळे तेथील लोकात परिस्थिती शरण देवभोळेपणा, संयम, सहनशीलता, सोशिकता आढळते.
6) माणदेशातील एकूण पर्यावरणामुळे तेथील लोकसंस्कृतीत विलक्षण एकजिनसीपणा जाणवतो.

## संदर्भ ग्रंथ : -

1) प्रा. डॉ. इंगोले कृष्णा-माणदेश: स्वरूप आणि विकास, शब्दशिवार प्रकाशन, सुधारित द्वितीय आवृत्ती 26 जाने-2023.
2) डॉ. मोकाशी सयाजीराजे - माणदेश: प्रश्न आणि परंपरा नाग-नालंदा प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 15 ऑगस्ट 2021.
3) प्रा. डॉ. इंगोले कृष्णा - 'माणदेशी साहित्य, शब्दशिवार प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 11 जुलै 2022.
4) प्रा. डॉ. पाटील तानाजी - धनगरांच्या परंपरा आणि संस्कृती, ग्राममित्र पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती 2019